आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२६ मार्च २०२५ - बुधवार

**ठळक बातम्या**

- महाराष्ट्र विधिमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन संस्थगित, पावसाळी अधिवेशन ३० जूनपासून मुंबईत सुरू होणार

- बँकविषयक कायदे सुधारणा विधेयकाला संसदेची मंजुरी

- बलात्काराच्या प्रयत्नाच्या गुन्ह्यासंदर्भात अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या वादग्रस्त आदेशाला सर्वोच्च न्यायालयाची स्थगिती

**आणि**

- शेअर बाजारातल्या तेजीला लगाम, मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे ७२९ अंकांची घसरण

**<><><><><>**

महाराष्ट्र विधिमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन संस्थगित आज झालं. पावसाळी अधिवेशन ३० जूनपासून मुंबईत सुरू होणार आहे,

विधानसभेचे उपाध्यक्ष म्हणून अण्णा बनसोडे यांची निवड झाल्याची घोषणा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आज केली. या पदासाठी बनसोडे यांचा एकमेव अर्ज आला होता.

राज्य सरकारच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमामध्ये राज्यातल्या ५० विकास योजना आणि पाच नगर रचना योजनांना मंजुरी देण्यात आल्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधान परिषदेत निवेदनाद्वारे केली.

दिवसभराच्या कामकाजानंतर विधानसभेचं कामकाज संस्थगित झालं. पावसाळी अधिवेशन ३० जूनपासून मुंबईत सुरू होणार आहे, असं अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी जाहीर केलं. या अधिवेशनात १९ बैठका झाल्या. त्यात ९ विधेयकं

मंजूर झाली. या अधिवेशनात एकूण १४६ तास कामकाज झालं, अशी माहिती अध्यक्षांनी दिली.

<><><><>

विधानपरिषदेचं कामकाजही आज संस्थगित झालं. या अधिवेशनात विधानपरिषदेचं कामकाज एकूण १५ तास ३६ मिनिटं झालं. रोज सरासरी ७ तास १३ मिनिटं कामकाज चाललं तर एकूण ५ तास ४५ मिनिटं वेळ वाया गेला. या अधिवेशनात विधानपरिषदेच्या पाच नव्या सदस्यांनी शपथ घेतली. या अधिवेशनात तीन शासकीय विधानपरिषद विधेयकं पुनर्स्थापित करण्यात आली, तीन विधेयके संमत झाली, चार विधानसभा विधेयके पारीत झाली तर पाच धन विधेयके कोणत्याही शिफारशीशिवाय विधानसभेकडे परत पाठवली.

<><><><>

तीस लाख रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या इलेक्ट्रिक वाहनांवर सहा टक्के कर लावण्याचा निर्णय सरकारनं घेतला होता, मात्र मंत्रिमंडळात यावर चर्चा होऊन असा कर लावण्याची गरज नाही असा निर्णय झाला. त्यामुळे हा कर लावला जाणार नाही असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी विधानपरिषदेत सांगितलं.

यूपीएससीच्या धर्तीवर एमपीएसीच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने घेण्याचा निर्णय कोणत्याही परिस्थितीत मागे घेणार नसल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं.

भाजपाचे गटनेते प्रवीण दरेकर यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या प्रवक्त्या सुषमा अंधारे यांच्याविरोधात हक्कभंगाचा प्रस्ताव विधानपरिषदेत मांडला. हा प्रस्ताव विशेषाधिकार समितीकडे पाठवल्याचं सभापती राम शिंदे यांनी सांगितलं.

<><><><>

देशाचं संविधान हे विकासाचे अस्त्र आहे. देशाची आतापर्यंतची प्रगती संविधान आणि त्यातून निर्माण झालेल्या निर्माण झालेल्या व्यवस्थेमुळे झाल्याचं

प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत केलं. संविधानाच्या अमृतमहोत्वाच्या निमित्तानं आयोजित चर्चेत ते बोलत होते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळे देशात संविधानाच्या माध्यमातून सामाजिक, राजकीय, आर्थिक क्रांती झाली. बाबासाहेबांनी या संविधानात केवळ वंचितांचा नव्हे तर प्रत्येक व्यक्तीचा विचार केला, असे मुख्यमंत्री म्हणाले.

समान नागरी कायदा लागू करण्याची जबाबदारी बाबासाहेब आंबेडकरांनी सर्व राज्यांना दिली. गोवंश हत्या बंदी कायदा संविधानानुसार आहे, याकडे फडनवीस यांनी लक्ष वेधलं. सामाजिक विषमता असेपर्यंत आरक्षण कायम राहील. त्याचवेळी जनसुरक्षा कायद्यातून कुठल्याही मूलभूत अधिकाराचे हनन होत नसल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

बँकविषयक कायदे सुधारणा विधेयक आज राज्यसभेत मंजूर झालं. बँक खात्यावर वारस म्हणून एकाऐवजी ४ नावं नोंदता यावी अशी तरतूद या विधेयकात आहे. बँकांच्या लेखा परीक्षकांचं मानधन ठरवण्याचा अधिकार बँकांना देणं, इत्यादी सुधारणा त्यात समाविष्ट आहेत. लोकसभेनं याआधीच हे विधेयक मंजूर केलं आहे.

**<><><><><>**

लोकसभेत आज त्रिभुवन सहकारी विद्यापीठ विधेयक २०२५ मंजूर झालं. त्यानुसार गुजरातमधल्या आणंद इथल्या ग्रामीण व्यवस्थापन संस्थेचं नाव बदलून त्रिभुवन सहकारी विद्यापीठ असं होणार असून संस्थेला विद्यापीठाचा तसंच राष्ट्रीय महत्वाच्या संस्थेचा दर्जा दिला जाणार आहे.

अमूल या सहकारी कंपनीची सुरुवात करणाऱ्या त्रिभुवनभाई पटेल यांचं नाव या विद्यापीठाला दिलं असल्याचं केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांनी सांगितलं.

**<><><><><>**

बलात्काराच्या प्रयत्नाच्या गुन्ह्याशी संबंधित, अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या वादग्रस्त आदेशाला सर्वोच्च न्यायालयानं आज स्थगिती दिली. या आदेशाची सर्वोच्च न्यायालयानं स्वतःहून दखली घेतली आहे. न्यायमूर्ती बी. आर. गवई आणि न्यायमूर्ती ए. जी. मसीह यांच्या खंडपीठानं उच्च न्यायालयाच्या या मतांबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली, आणि हा आदेश धक्कादायक असल्याचं नमूद केलं. या आदेशाच्या काही भागात संबंधित न्यायाधीशांची असंवेदनशीलता स्पष्टपणे दिसून येत आहे आणि हे अतिशय वेदनादायी आहे, असंही खंडपीठानं म्हटलं आहे.

<><><><><>

भारतीय शेअर बाजारांमध्ये सलग सात सत्रांमधल्या वाढीनंतर आज घसरण दिसून आली. मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकात आज ७२९ अंकांची घसरण झाली आणि तो ७७ हजार २८९ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १८२ अंकांची घसरण नोंदवत २३ हजार ४८७ अंकांवर बंद झाला.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज गुहाहाटी इथं राजस्थान रॉयल्स आणि कोलकत्ता नाईट रायडर्स यांच्यात सामना सुरु आहे. कोलकत्ता नाईट रायडर्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा राजस्थान रॉयल्सच्या ८ षटकात २ बाद ६७ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

संरक्षण मंत्रालयानं आज भारत फोर्ज आणि टाटा एडवान्सड सिस्टिम्स या दोन कंपन्यांशी अत्याधुनिक तोफा आणि त्यांना वाहून नेणाऱ्या खास वाहनांच्या खरेदीचा करार केला. नवी दिल्लीत केलेल्या या कराराचं मूल्य ६ हजार ९०० कोटी रुपये आहे. याबरोबरच संरक्षण मंत्रालयाने चालू आर्थिक वर्ष २०२४-२५

मध्ये १ लाख ४० हजार कोटी रुपयांच्या संरक्षणविषयक खरेदीचा टप्पा गाठला आहे.

<><><><>

छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात आज ९ माओवाद्यांनी शरणागती पत्करली. त्यात ६ महिलांचा समावेश आहे. या सर्वांवर मिळून २६ लाख रुपयांचं बक्षीस होतं आणि अनेक हिंसक घटनांमधे त्यांचा हात होता. वरिष्ठ पोलीस आणि सीआरपीएफ अधिकाऱ्यांसमोर त्यांनी शरणागती पत्करली.

<><><><>

अभिनेत्री रुही सिंग यांना इंडियन कॉमिक्स असोसिएशनची प्रादेशिक ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्त करण्यात आलं आहे आणि त्या वेव्हज २०२५ या कार्यक्रमात असोसिएशनचं प्रतिनिधित्व करणार आहेत.

<><><><>

बिमस्टेक या भारतासहित ७ देशांच्या प्रतिनिधी मंडळाने व्यापार क्षमता वर्धन कार्यक्रमाच्या अंतर्गत आज भारत-बांगलादेश सीमेवरच्या आगरतळा एकात्मिक तपासणी नाक्याला भेट दिली. तपासणी नाक्याच्या कार्यपद्धतीविषयी त्यांनी माहिती करून घेतली. बांगलादेश किंवा नेपाळ या देशांमधून भारतात येणारे आणि पुढे इतर दक्षिण आशियाई देशांत जाणारे असे मोठे रस्ते बांधले तर संपूर्ण दक्षिण आशियाचा आर्थिक विकास होऊ शकेल असं मत प्रतिनिधी मंडळानं व्यक्त केलं.

<><><><>

देशभरातल्या सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांतले  धान्य व्यापारी , अडते आणि प्रक्रियाकर्त्यांनी त्यांच्याकडचा गव्हाचा  साठा येत्या एक एप्रिलपासून दर आठवड्याला सरकारच्या ऑनलाईन पोर्टलवर जाहीर करण्याचे आदेश सरकारनं दिले आहेत. देशातली अन्न सुरक्षा राखण्यासाठी आणि बाजारभावातले चढउतार

नियंत्रित करण्यासाठी आखलेल्या सर्वसमावेशक धोरणाला अनुसरून हा आदेश दिला असल्याचं सरकारी पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><>**

परदेश व्यवहार मंत्री डॉ एस जयशंकर यांनी आज अमेरिकेच्या चेंबर ऑफ कॉमर्स आणि सिईओ सुझन क्लर्क यांची नवी दिल्लीत भेट घेतली. दोन्ही देशांमध्ये व्यापारउदीम,गुंतवणूक यात वाढ व्हावी ,लवचिक पुरवठा साखळीची निर्मिती आणि व्यूहात्मक भागीदारी बळकट करणं यावर चर्चा झाल्याचं जयशंकर यांनी म्हटल आहे.

**<><><><>**

राज्यातल्या सर्व महसूल मंडळांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज ‘महा-राजस्व समाधान शिबिर योजना’ सुरू होत असल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानभवन परिसरात माध्यमांशी बोलताना दिली. वर्षातून चारवेळा हे शिबिर लावलं जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

या शिबिरात नागरिकांना त्यांच्या तक्रारी मांडता येतील, आणि महसुली मुख्यालयापर्यंत जावं लागणार नाही, असं त्यांनी स्पष्ट केलं.

**<><><><>**

आर्थिक यंत्रणा सुरक्षित ठेवण्यासाठी धोरणकर्त्यांनी केलेले नियम आणि उचललेल्या पावलांमुळे कायद्याला धरून होणाऱ्या कामांमध्ये अडथळे निर्माण होता कामा नयेत, असं झालं तर हे आर्थिक समावेशनाच्या दृष्टीनं हानीकारक ठरू शकतं, असं भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत फायनान्शिअल ॲक्शन टास्क फोर्सच्या खासगी क्षेत्र सहकार्य मंच २०२५च्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

**<><><><>**

जम्मू-काश्मीर इथे नियंत्रण रेषेनजीक कर्तव्यावर असताना शहीद झालेल्या संगमनेर तालुक्यातले रामदास बढे यांच्यावर त्यांच्या गावी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. शहीद बढे हे लष्कराच्या मराठा रेजिमेंटमध्ये हवालदार पदावर कार्यरत होते. परवा तंगधार सेक्टरमध्ये कर्तव्य बजावत असताना बढे यांना वीरमरण आलं. **भा**रतीय लष्कराच्या मराठा फिल्ड रेजिमेंट आणि पोलिसांच्या पथकांनी हवेत बंदुकीच्या फैरी झाडून त्यांना मानवंदना दिली.

**//<><><><><>//**